क्रमांक :- ग्रापापु-१००४/प्रक्र-६३६/पापु-०७,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
**दिनांक :- २३ मार्च, २००५**

विषय: विंधण विहिर कार्यक्रमासाठी खाजगी विंधणयंत्रा मार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तदअनुषंगीक बाबीचे दर ठरविण्याबाबत.

संदर्भ: शासन ज्ञापन समक्रमांकीत दिनांक ३०.१०.२००४

ज्ञापन:

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात घ्यावयाच्या विंधण विहिरींकरिता खाजगी विंधणयंत्र धारकांची यंत्रे भाडयाने लावण्याचे व तदअनुषंगीक बाबीचे दर संदर्भिय शासन ज्ञापनन्वये ठरवून देण्यात आले आहेत. यामध्ये विंधण विहिरीसाठी वापरण्यात येणाऱ्या लोखंडी केसिंग पाईपच्या दराचा समावेश आहे. लोखंडी केसिंग पाईप तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्टीलच्या दरांमध्ये मागील काही दिवसांमध्ये झालेल्या दरवाढी मुळे संदर्भीय शासन ज्ञापनान्वये ठरवून दिलेल्या दराने लोखंडी केसिंग पाईप विंधण विहिरींवर बसविणे खाजगी विंधणयंत्र धारकांना परवडत नसल्याने या लोखंडी केसिंग पाईपाच्या दरात वाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच, राज्यातील काही भागांमध्ये विंधण विहिरींवर लोखंडी केसिंग पाईप ऐवजी यु.पी.व्ही.सी. केसिंग पाईप लावण्यास परवानगी देण्यात आलेली असल्याने या यु.पी.व्ही.सी. केसिंग पाईपचा दरही निश्चित करुन देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

२. वरील बाबीचा विचार करुन विंधण विहिरींवर बसविण्यात येणाऱ्या लोखंडी केसिंग पाईपचा व यु.पी.व्ही.सी. केसिंग पाईपचा दर शासन पुढील प्रमाणे मंजूर करित आहे:-

| अ.क्र | कामाचा तपशिल | या ज्ञापन्वावये मंजूर करण्यात आलेला दर |
|---|---|---|
| **(अ)** | **१५० मि.मी. व्यासाचे डि.टी. एच. विंधण कामाच्या अनुषंगीक कामे.** | |
| १. | १५० मि.मी व्यासाचा एम.एस., ई.आर.डब्ल्यू. मिडियम क्लास लोखंडी केसिंग पाईप ( IS 1239) | **रु. ८००/- प्रति मिटर** |
| २. | १५० मि.मी. व्यासाचा यु.पी.व्ही.सी. केसिंग पाईप (CS as per IS 12818 - 1992) बाहेरील व्यास: १६५.४ मि.मी. व कमितकमी जाडी : ५.७ ते ६.५ मि.मी. | **रु. ४०१/- प्रति मिटर** |
| **(ब)** | **१५० मि.मी. व्यासाच्या नलिका कुपाचे रोटरी विंधनकामाच्या अनुषंगिक कामे.** | |
| १. | १५० मि.मी व्यासाचा एम.एस., ई.आर.डब्ल्यू. मिडियम क्लास लोखंडी केसिंग पाईप ( IS 1239) | **रु.८००/- प्रति मिटर** |
| २. | १५० मि.मी व्यासाचा एम.एस., ई.आर.डब्ल्यू. मिडियम क्लास लोखंडी केसिंग पाईप (जाळीचा) ( IS 1239) | **रु.९१०/- प्रति मिटर** |
| **(क)** | **११५ मि.मी. व्यासाच्या विंधणकामाच्या अनुषंगिक कामे** | |
| १. | १२५ मि.मी. व्यासाचा एम.एस., ई.आर.डब्ल्यू. मिडियम क्लास लोखंडी केसिंग पाईप ( IS 1239) | **रु.६५०/- प्रति मिटर** |
| २. | १२५ मि.मी. व्यासाचा यु.पी.व्ही.सी. केसिंग पाईप (CM as per BIS 12818 - 1992) बाहेरील व्यास: १४० मि.मी. व कमितकमी जाडी : ६.५ ते ७.३ मि.मी. | **रु.३८३/- प्रति मिटर** |

वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
आवक क्र. १२८ दि. २१/४/०५

३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु १००४/प्र.क्र.२१७/पापु-७, दिनांक ७ फेब्रुवारी, २००५ अन्वये राज्यातील ज्या भागात यु.पी.व्ही.सी. केसिंग पाईप वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्या भागात विंधन विहिर घेताना केसिंग पाईप म्हणून यु.पी.व्ही.सी. केसिंग पाईप वापरावयाचा अथवा लोखंडी केसिंग पाईप वापरावयाचा याचा निर्णय घेण्याची मुभा संबंधित गावाच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस देण्यात येत आहे. या समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे वरील मान्य दरानुसार केसिंग पाईपसाठी शासन सहभागाची रक्कम संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी.

४. शासन मान्य दरानुसार विंधन विहिरींचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. अंदाजपत्रकात स्त्रोत सर्वेक्षणासाठी खर्च अंतर्भूत असेल व खर्च ज्या संस्थेने (एजन्सीने) सर्वेक्षण केले असेल त्यांना संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने अदा करावा. म्हणजेच स्त्रोतांचे सर्वेक्षण भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने केले असल्यास तेवढा निधी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेस देवून त्यांनी तो शासनाच्या तिजोरीत जमा करावा. तर स्त्रोतांचे सर्वेक्षण जिल्हा परिषदेमधील भूवैज्ञानिकांमार्फत करण्यात आले असल्यास तेवढा निधी जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये जमा करण्यात यावा. खाजगी मान्यताप्राप्त संस्थेने स्त्रोतांचे सर्वेक्षण केले असल्यास तेवढा निधी त्यांना देण्यात यावा. योजनेची अंमलबजावणी ग्रामस्तरावर ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करतांना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने **कामाच्या दर्जात/ गुणवत्तेत कोणतीही** तडजोड न करता व अंदाजपत्रकात नमूद सर्व कामे योग्यरित्या केल्यावर अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा कमी खर्चात ग्रामस्थांच्या एकीमुळे काम करुन घेतल्याने अंदाजपत्रकानुसार खर्चात झालेल्या बचतीची रक्कम संबंधित गावास, गावातील हातपंपाच्या भविष्यातील देखभाल व दुरुस्तीसाठी वापरता येईल. सदर रक्कम संबंधित गावाने त्याच कारणासाठी वापरावी. ही रक्कम इतर कामासाठी ग्रामपंचायतीला वळती करता येणार नाही.

५. हे आदेश दिनांक १० मार्च, २००५ पासून लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**( सुधीर ठाकरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे-०५
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
६. उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
७. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
८. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (सर्व)
९. उपअभियंता, यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखापरिक्षक) (लेखा व अनुज्ञेय)
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखापरिक्षक) (लेखा व अनुज्ञेय)
१२. कोषागार अधिकारी (सर्व)
१३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
१५. निवडनस्ती (पापु-०७)